एकात्मिक औद्योगिक क्षेत्र विकसित करताना
विकासकांना सोयी सवलती देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र. आयडीसी २०१८/प्र.क्र. १३०/उद्योग १४.
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १५ फेब्रुवारी, २०१८.

वाचा :- १) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.आयआयआय-पॉलिसी २०१०/प्र.क्र.७६८/उद्योग-२, दिनांक २२ फेब्रुवारी २०१३.
२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.आयटीपी २०१३/ प्र.क्र.२६५/ उद्योग-२, दिनांक २५ ऑगस्ट २०१५.
३) नगरविकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस१८१६/प्र.क्र.३६८/१५/२०(४) / नवि१३, दि. २६.१२.२०१६.
४) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.आयडीसी- २०१५/प्र.क्र.९३/ उद्योग-१४, दिनांक २७ डिसेंबर २०१६.
५) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.आयडीसी- २०१५/प्र.क्र.९३/ उद्योग-१४, दिनांक २२ जानेवारी २०१८.

प्रस्तावना :-

राज्याच्या विशेष नागरी वसाहत धोरणाप्रमाणे एकात्मिक औद्योगिक क्षेत्र (आयआयए) ला प्रोत्साहन देण्यासाठी सुसंगत बदल व प्रोत्साहने देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

शासन निर्णय क्र.आयडीसी- २०१५/प्र.क्र.९३/उद्योग-१४ दिनांक २७ डिसेंबर २०१६ मध्ये सुधारणा करुन एकात्मिक औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याकरीता पुढीलप्रमाणे सोयी सवलती देण्यास याव्दारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

१. **एकात्मिक औद्योगिक क्षेत्राकरीता क्षेत्रफळ किमान मर्यादा शिथील करणे :-**

"एकात्मिक औद्योगिक क्षेत्र" म्हणून घोषित होण्यास पात्र होण्यासाठी किमान क्षेत्रफळ ४० हेक्टर (१०० एकर) असावे ही अट जागेवरील परिस्थीती, जमीन संपादनास येणाऱ्या अडचणी, सलगतेने उपलब्ध होणारे क्षेत्र, जागेची उपलब्धता इत्यादी बाबी विचारात घेऊन किमान क्षेत्रफळ २० हेक्टर (५० एकर) पर्यंतच्या क्षेत्रास शिथीलता देण्याचे अधिकार हे सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखालील असलेल्या उच्चाधिकार समितीस याव्दारे देण्यात येत आहेत.

२. **पोहच रस्ता :-**

"एकात्मिक औद्योगिक क्षेत्र" म्हणून घोषित होण्यास पात्र होण्यासाठी किमान २४ मीटर रुंदीचा प्रवेश रस्ता उपलब्ध असावा हि अट जागेवरील परिस्थीती, उपलब्ध असलेला पोहच मार्ग, पोहच मार्ग उपलब्ध

होण्यासाठी जमीन संपादनामध्ये येणाऱ्या अडचणी, जागेची उपलब्धता इत्यादी बाबी विचारात घेऊन किमान १२ मीटर पर्यंत रुंदीच्या प्रवेश रस्त्यास शिथीलता देण्याचे अधिकार हे सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखालील असलेल्या उच्चाधिकार समितीस याव्दारे देण्यात येत आहेत.

३. **मुद्रांक शुल्क माफी :-**

एकात्मिक औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी खरेदी करण्यात येणाऱ्या जमिनीवर विकासकास ५० टक्के पर्यंत मुद्रांक शुल्क माफी देण्यात येत आहे. विशेष नगर वसाहत प्रकल्पाकरीता मुद्रांक शुल्क माफीबाबत नगरविकास विभागाकडून बदल / सुधारणा केल्यास त्या एकात्मिक औद्योगिक क्षेत्रास लागू राहतील.

४. **सरकारी क्षेत्र हस्तांतरण :-**

एकात्मिक औद्योगिक क्षेत्र स्थापन करताना संपादित क्षेत्राच्या सलगतेसाठी विकासकास सरकारी क्षेत्राची आवश्यकता असल्यास व सदर सरकारी क्षेत्र निर्बाध्य असल्यास सदर क्षेत्र महसूल विभाग महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे प्रचलित धोरणानुसार वर्ग करेल. प्रस्तुत क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ बाजारमुल्याच्या दरानुसार विकासकास एकात्मिक औद्योगिक क्षेत्राकरीता वाटप करण्याची कार्यवाही करेल. सदरचे क्षेत्र हे एकात्मिक औद्योगिक क्षेत्राचाच भाग राहील.

५. **वीज पुरवठा :-**

एकात्मिक औद्योगिक क्षेत्रातील सर्व उद्योग घटकांची अथवा काही उद्योग घटकांची विजेची गरज १ मेगावॅटपेक्षा जास्त असल्यास त्याठिकाणी विकासक स्वत:च्या खर्चाने सबस्टेशन उभारून मुक्त प्रवेशाव्दारे (Open Access) अन्य वीज पुरवठादाराकडून वीज खरेदी करू शकेल व प्रस्तुत IIA क्षेत्रातील उद्योग घटकांना वीजपुरवठा करण्याची त्यास मुभा असेल. तसेच एकात्मिक औद्योगिक क्षेत्रातील विकासक / उद्योजकास स्वत: विद्युत निर्मिती (Captive Power Generation) करण्याची मुभा राहील.

६. **अनुज्ञेय चटई निर्देशांक (FSI) :-**

नगरविकास विभागाच्या दिनांक २६.१२.२०१६ च्या अधिसूचने मध्ये विशेष नगर वसाहत प्रकल्पासाठी अनुज्ञेय करण्यात आल्याप्रमाणे एकात्मिक औद्योगिक क्षेत्राकरीता चटई क्षेत्र व अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक (FSI) अनुज्ञेय राहिल. त्यानुसार विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. ज्या ज्या वेळी प्रस्तुत धोरणाच्या अनुषंगाने नगरविकास विभागाकडून बदल / सुधारणा केल्या जातील ते बदल / सुधारणा एकात्मिक औद्योगिक क्षेत्रास लागू राहतील.

७. <u>विकास शुल्कामध्ये सवलत :-</u>

नगरविकास विभागाच्या दिनांक २६.१२.२०१६ च्या अधिसूचने मध्ये विशेष नगर वसाहत प्रकल्पासाठी विकास शुल्कामध्ये ५० टक्के सवलत देण्यात आली आहे. त्याच धर्तीवर एकात्मिक औद्योगिक क्षेत्राकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून आकारण्यात येणाऱ्या विकास शुल्कामध्ये विकासकास ५० टक्के सवलत अनुज्ञेय करण्यात येत आहे. ज्या ज्या वेळी प्रस्तुत धोरणाच्या अनुषंगाने नगरविकास विभागाकडून बदल / सुधारणा केल्या जातील ते बदल / सुधारणा एकात्मिक औद्योगिक क्षेत्रास लागू राहील.

८. प्रस्तुत सवलती शासकीय संस्था / महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ/ सिडको यांच्याकडून प्राप्त जमिनीवर स्थापित विशेष आर्थिक क्षेत्रामधून विनाअधिसूचित होऊन स्थापन झालेल्या / होणाऱ्या एकात्मिक औद्योगिक क्षेत्रास लागू राहणार नाही.

या शासन निर्णयानुसार सर्व संबंधित विभागांनी आवश्यक ते आदेश / अधिसूचना त्वरीत निर्गमित कराव्यात.

सदर शासन निर्णय महसूल, ऊर्जा व वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१५१८११२५७६१० असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anilkumar R Ugale

Digitally signed by Anilkumar R Ugale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1d265dc74c98f72f41f5a1403db16525e09e7de2e336c366de3a32ea2a050a8a, serialNumber=8bbd8635d43d23f28021156f38051619258c5123866 8f40d15d3209ea39554aa, cn=Anilkumar R Ugale
Date: 2018.02.15 18:20:54 +05'30'

(अनिलकुमार रा. उगले)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति :

१. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (उद्योग), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (उद्योग), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री (सर्व) व मा. राज्यमंत्री (सर्व), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
७. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
८. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई

९. मा. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

१०. मा. प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

११. मा. प्रधान सचिव (नगर विकास), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

१२. मा. प्रधान सचिव, ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई

१३. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई

१४. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई.

१५. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.

१६. संचालक नगररचना, पुणे

१७. सर्व उपसंचालक /सहाय्यक संचालक (नगर रचना)

१८. निवड नस्ती.

//*////*/*/*

Incentive for Development of Integrated Industrial Area.

Government of Maharashtra

Industry, Energy and Labour Department
Government Resolution No. IDC/2018/C.R. 130/Industry-14
Mantralaya, Madam Cama Road,
Hutatma Rajguru Chowk, Mumbai -32.
Dated:- 15th February, 2018.

Read: 1) Government Resolution Industry, Energy and Labour Department no. III-policy-2010/C.R 768/Industry-2, dated 22/02/2013.

2) Government Resolution Industry, Energy and Labour Department no. ITP-2016/(C.R.265)/Industry-2, dated 25/08/2015.

3) Government Notification Urban Development Department no. TPS- 1816/C.R. 368/15/20 (4)/UD-13, dated 26/12/2016.

4) Government Resolution Industry, Energy and Labour Department no. IDC-2015/C.R. 93/Industry-14, dated 27/12/2016.

5) Government Resolution Industry, Energy and Labour Department no. IDC-2015/C.R. 93/Industry-14, dated 22/01/2018.

Introduction:

To promote and make Integrated Industrial Area (IIA) in the State competitive and at par with special township Projects. Certain incentives and changes in existing policy were under consideration of this Government.

Government Resolution :-

In view of above Government has decided to give following incentive for development of Integrated Industrial Area (IIA) in modification of Government Resolution Industry, Energy and Labour Department no. IDC- 2015/C.R. 93/Industry-14, dated 27/12/2016.

1. Relaxation in Minimum Area Required for integrated industrial area: -

As per Development Control Rule of IIA the minimum area required for “Integrated Industrial Area" is 40 hectares (100 acres).However depending on location, difficulties in acquisition of land, availability of continuously available area, etc.Relaxation for area requirement not less than 20 hectares (50 acres) shall be considered. Power to approve this relaxation is hereby given to the High Power Committee under the chairmanship of Secretary (Industry).

2. Relaxation in Minimum width Approach Road :-

As per Development Control Rule of IIA the minimum 24 meter width entry road should be available for declaration of an "Integrated Industrial Area". However if the approach road width is not available due to difficulty in acquisition of land, availability of land, etc. Relaxation for width of approach road not less than 12 meter shall be considered. Power to approve this relaxation is hereby given to the High Power Committee under the chairmanship of Secretary (Industry).

3. Concession in Stamp Duty : -

To established IIA, a concession to the extent of 50% of stamp duty , shall be granted, for purchase land to Project Proponent/s . As and when any change is made w.r.to Concession in Stamp Duty under Special Township Policy same will be applicable to the integrated industrial area mutatis mutandis.

4. **Grant of Government Land: -**

For establishment of Integrated Industrial Area if the Government land is required for maintaining contiguity, and if such land is free from all encumbrances then such land can be transferred to MIDC as per the prevailing policy of Revenue and Forest Department, Government of Maharashtra, Then such land can be allotted to developer by MIDC for the development of IIA at the market rates. This area will be part of the integrated industrial area.

5. **Permissible Floor Space Index (FSI):** -

In the Notification dated 26.12.2016 of the Urban Development Department, for special township project additional FSI is allowed, on similar ground the floor space index and additional floor space index (FSI) will be allowed for Integrated Industrial Area. As and when any change is made w.r.to grant of additional FSI under Special Township Policy same will be applicable to the integrated industrial area mutatis mutandis.

6. **Electricity supply:**

In case power requirement of all units in an IIA or few units is more than 1 MW, then the developer of the IIA can erect its infrastructure and supply electricity to concern units after obtaining the same via open access. Also, captive power generation will be allowed.

7. Exemption In Payment Of Development Charges: -

As per notification dt. 26.12.2016 of Urban Developement Department Special Township Projects are levied 50 % of Development Charges. On similar line MIDC shall levy 50 % of development charges to Integrated Industrial Area Projects. As and when any change is made w.r.to grant of Exemption In Payment Of Development Charges under Special Township Policy same will be applicable to the integrated industrial area mutatis mutandis.

8. Benefits flowing out of this order shall not be applicable to IIA formed by the Denotification of SEZs where land was allotted by MIDC/CIDCO/ Government Entities.

Based on this Government Resolution all concerned departments will issue necessary order/ GRs/ Notification in this regard.

This Government Resolution is made available on the Maharashtra Government website **www.maharashtra.gov.in** and reference no. of this is 201802151811257610 . This order has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

Anilkumar R Ugale

Digitally signed by Anilkumar R Ugale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1d265dc74c98f72f41f5a1403db16525e09e7de2e336c366de3a32ea2a050a8a, serialNumber=8bbd8635d43d23f28021156f38051619258c51238668f40d15d3209ea39554aa, cn=Anilkumar R Ugale
Date: 2018.02.15 18:21:09 +05'30'

(Anilkumar R. Ugale)
Section Officer to Government of Maharashtra.

To,

1) Principal Secretary to Hon. Governor.
2) Principal Secretary to Hon. Chief Minister, Mantralaya, Mumbai-32.
3) Private Secretary to Hon. Minister (Industries), Mantralaya, Mumbai-32.
4) Private Secretary to Hon. Minister of State (Industries), Mantralaya, Mumbai-32.

5) Private Secretary to all Hon. Ministers and Ministers of State, Mantralaya, Mumbai-32.
6) Private Secretary to Hon. Leader of Opposition, Maharashtra Legislative Assembly, Maharashtra Legislature Secretariat, Vidhan Bhavan, Mumbai.
7) Private Secretary to Hon. Leader of Opposition, Maharashtra Legislative Council, Maharashtra Legislature Secretariat, Vidhan Bhavan, Mumbai.
8) Hon. Chief Secretary, Government of Maharashtra, Mantralaya, Mumbai.
9) Additional Chief Secretaries (Finance), Finance Department, Mantralaya, Mumbai.
10) Principal Secretary (Revenue), Forest and Revenue Department, Mantralaya, Mumbai.
11) Principal Secretary (Urban Development), Urban Development, Mantralaya, Mumbai.
12) Principal Secretary (Energy), Industry, Energy and Labour Departmenrt, Mantralaya, Mumbai.
13) Chief Executive Officer, Maharashtra Industrial Development Corporation.
14) Development Commissioner (Industries).
15) All Collectors, Maharashtra State.
16) Directore Town Planning, Maharashtra State, Pune.
17) All Deputy Directors/ Assistant Directors, Town Planning.
18) Select File (Industries-14).

//*////*/*/*